# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-6465145/46 कार्यासन दु. क्र. 0712-6465145

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

**अत्यंत महत्वाचे** **क्र.तशिस/प्राकाना/शैवि-2/Transfer/पदविका2017/** 1562

**दिनांक:-** 21 JUN 2017

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये पदवीका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे संस्था बदल (College Transfer) करण्याबाबत

संदर्भ:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.10/एनजीपी/संस्था स्थलांतर/2017/3500 , दि. 16 जुन 2017

शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये पदवीका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे संस्था बदल करण्याकरीता संदर्भिय परिपत्रान्वये निकष ठरवून दिलेले आहे. विद्यार्थ्यांना संस्था बदल करण्याकरीता संस्थेने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. संस्था बदल करण्याकरीता विद्यार्थ्यांना ना-हरकत-प्रमाणपत्र (NOC) देण्याकरीता अडवणूक करू नये.
2. विद्यार्थी ज्या संस्थेत शिक्षण घेत आहे त्या संस्थेने विद्यार्थ्यास संस्था बदल करण्याकरीता NOC देतेवेळी संस्था बदलाच्या निकषात बसत असल्यास NOC प्रदान करावी व NOC ही विहित प्रपत्रात असणे आवश्यक आहे. (संदर्भीय परीपत्रकासह प्रपत्र संलग्न)
3. विद्यार्थ्याला ज्या संस्थेत बदल करावयाचा आहे अश्या संस्थेने सदरहू विद्यार्थ्यांचा विहित नमुन्या अर्ज, पालक संस्थेची NOC प्राप्त करून जेवढे विद्यार्थी आपल्या संस्थेत संस्था बदलाने येणार आहे अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज आपल्या संस्थेच्या NOC व रिक्त जागेसह एकत्रित या कार्यालयास सादर करावे.
4. प्रथम वर्षातून दुस-या वर्षात संस्था बदल करण्याकरीता प्रथम व व्दितीय सत्रात पास होणे (अथवा दोन्ही सत्र मिळून एक विषय बॅक)आवश्यक आहे. दसऱ्या वर्षातून तिसऱ्या वर्षात संस्था बदलीकरीता प्रथम वर्ष पुर्ण पास व तृतीय व चुतर्थ सत्रात पास होणे (अथवा दोन्ही सत्र मिळून एक विषय बॅक)आवश्यक आहे.
5. **संस्था बदलीकरीता आवश्यक कागदपत्रे**:- १) सर्व गुणपत्रिका २) शिक्षण घेत असलेल्या संस्थेची NOC 3) ज्या संस्थेत बदल हवा आहे त्या संस्थेची NOC (रिक्त जागेसह) ४) विहीत नमुन्यात विद्यार्थ्याचा अर्ज ५) MSBTE पात्रता (आवश्यक असल्यास) ६) संस्था बदलाबाबतची कारणे ७) GAP Certificate (आवश्यक असल्यास) ८) ज्या संस्थेत विद्यार्थ्याला संस्था बदल हवा आहे त्या संस्थेच्या प्राचार्यामार्फत एकत्रित प्रस्ताव तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर येथे सादर करावा.
6. विद्यार्थी अथवा त्यांचे पालक यांना या कार्यालयात संस्था बदलाबाबत प्रस्तावासह पाठवू नये.

7. तसेच थेट द्वितीय वर्षाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीसेसाठी संचालनालयास रिक्त जागांचा तपशिल सादर करण्यापुर्वी दि.3 जुलै 2017 पर्यंत विद्यार्थ्यांचे संस्था बदल /अभ्यासक्रम बदलाबाबतची कार्यवाही पुर्ण करावयाची आहे.त्यानंतर पोस्ट एस.एस.सी थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रीयेसाठी अभ्यासक्रम निहाय रिक्त जागांचा तपशिल संस्थेच्या लॉगीन मधुन ऑनलाईन पध्दतीने संचालनालयास दि. 3 जुलै 2017 5.00 वाजेपर्यंत कळविण्यात यावा.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादित
ईमेलव्दारे

जा.क्र.१०/एनजीपी/ संस्था स्थलांतर/२०१७/ 3500
दिनांक : 16 JUN 2017

प्रति,
१)सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे
२) प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी
तंत्रनिकेतने, महाराष्ट्र राज्य

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्यें पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या व्दितीय वर्षात / अभ्यासक्रमात बदल / स्थलांतराने संस्थाबदल करण्याबाबत.....
संदर्भ- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, यांचे दि. २४.४.२०१७ रोजीचे नोटीफिकेशन

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया मा. आयुक्त व सक्षम प्राधिकारी, महाराष्ट्र शासन, राज्य सामाईक परीक्षा कक्ष, मुंबई यांचे मार्फत राबविण्यात येत आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी पदविका प्रथम अभ्यासक्रमाच्या थेट व्दितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु होत आहे.

प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पुर्ण केल्यांनतर म्हणजेच प्रथम व व्दितीय सत्र उत्तीर्ण असलेले किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैंकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेले, पाठयक्रम किंवा पाळी बदलण्याची विनंती करणा-या उमेदवाराला, जागांच्या उपलब्धतेच्या अधिन राहुन त्याच संस्थेत तसे बदल करण्याची मुभा राहील. तसेच हे बदल प्रथम वर्षाच्या /प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे करण्यात येतील. उमेदवार जो पाठयक्रम बदलुन घेणार आहे त्या पाठयक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने निर्धारीत केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी संबधित संस्थेच्या प्राचार्यांची राहील.

२. उमेदवाराचे एक किंवा दोन वर्षानंतर पाठयक्रम किंवा संस्था बदल खालील प्रमाणे करण्यात येतील.
( क ) प्रथम/व्दितीय वर्षात एकदा प्रवेश घेतलेला उमेदवार त्या शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलुन मागण्यास पात्र असणार नाही.

( ख ) प्रथम वर्षाच्या परीक्षेमध्ये ( प्रथम व व्दितीय या दोन्ही सत्रांच्या )/व्दितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये (तृतीय व चतुर्थ सत्रांच्या) सर्व विषयामध्ये उत्तीर्ण असणारा किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या विषयापैंकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेला उमेदवार तसेच व्दितीय वर्षातील बदलासाठी प्रथम वर्षात उत्तीण उमेदवारास संस्था किंवा पाठयक्रम बदलुन घेण्यास प्राप्त असेल.

( ग ) विनाअनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत शासकीय, शासकीय अनुदानित विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित संस्था, कोणत्याही टप्प्यावर बदलुन घेता येणार नाही. तथापी शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित संस्थेतील विद्यार्थ्याला विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये बदल करुन देण्याची मागणी करता येईल.

( घ ) विद्यार्थ्यांना कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थांमध्ये बदलुन जाता येणार नाही.

( ड ) विनाअनुदानित संस्थाचे प्राचार्य हे तंत्रशिक्षण संचालनालयाच्या पुर्व मान्यतेने, संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पात्रता प्रमाणपत्र व रिक्त जागांबाबतची स्थिती सादर केल्यानंतर, बदल करुन घेण्याच्या मागणीसाठी इतर संस्थामधील उमेदवारांचा विचार करण्यात यावा. उमेदवार जो पाठयक्रम बदलून घेणार आहे, त्या पाठयक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने निर्धारीत केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती संस्थेचे प्राचार्य किंवा संचालक करतील.

(च ) संस्थेच्या प्राचार्यांच्या शिफारशी शिवाय संस्था बदल अथवा पाठयक्रम बदलासाठीचा कोणताही अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाकडुन दाखल करुन घेतला जाणार नाही.

३. अधिसंख्य कोटयातील ( Supernumerary Quota ) जागे अंतर्गत प्रवेश देण्यात आलेले उमेदवार हे पाठयक्रम किंवा संस्था बदलण्यासाठी पात्र असणार नाहीत.)

४. विभागांतर्गत विद्यार्थ्यांचे संस्था बदल/पाठयक्रम बदलाबाबतची कार्यवाही त्या-त्या सहसंचालक, विभागीय कार्यालयाकडुन विहीत कालावधीत करण्यात यावी व त्याची एक प्रत तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा, मुंबई व मा. आयुकत, प्रवेश नियामक प्राधिकरण, म. रा., मुंबई यांना देण्यात यावी.

५. आतंर विभागीय विद्यार्थ्यांचे संस्था बदल/पाठयक्रम बदलासाठी विद्यार्थ्यांचे अर्ज आवश्यक कागदपत्रासह संबधित विभागीय कार्यालयामार्फत तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा, मुंबई येथे सादर करावेत. विहीत कालावधी नंतर प्राप्त होणा-या संस्था बदल/पाठयक्रम बदलासाठीच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच थेट व्दितीय वर्षाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेसाठी संचालनालयास रिक्त जागांचा तपशिल सादर करण्यापुर्वी दि. ३ जुलै २०१७ पर्यत विद्यार्थ्यांचे संस्था बदल/अभ्यासक्रम बदलाबाबतची कार्यवाही पुर्ण करावयाची आहे. त्यानंतर पोस्ट एस. एस. सी. थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रीयेसाठी अभ्यासक्रम निहाय रिक्त जागांचा तपशिल संस्थेच्या लॉगीन मधुन ऑनलाईन पध्दतीने या संचालनालयास दि. ३ जुलै २०१७ रोजी ५.०० वाजेपर्यत कळविण्यात यावा.

( चंद्रशेखर ओक ) भा.प्र.से.
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) मा.आयुक्त, महाराष्ट्र शासन, प्रवेश नियंत्रण प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, मुंबई ५१ यांना माहितीसाठी सादर
२) प्रणाली व्यवस्थापक, कार्यासन क्र. ३ आय टी सेल मुख्य कार्यालय, यांना माहीती व पुढील आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित. तसेच त्यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाचे संकेत स्थळावर तात्काळ प्रसिध्द करावे. तसेच संस्था निहाय, अभ्यासक्रम निहाय थेट व्दितीय वर्ष पदविका प्रवेशासाठी रिक्त जागांचा तपशिल ऑनलाईन प्रत्येक संस्थेकडून विहीत मुदतीत प्राप्त होत आहे याची खात्री करावी.